R.No.MAHMAR/25/A3029

दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ५ वे अंक ११८ बुधवार दि.१९ नोव्हेंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.




## 'गॅस सिलिंडर'साठी वंचित उच्च न्यायालयात

मुंबई : प्रतिनिधी



पक्षाचे निवडणूक चिन्ह राज्य निवडणूक आयोगाने मुक्त चिन्हांच्या यादीत समाविष्ट केल्याच्या निर्णयाविरोधात वंचित बहुजन आघाडीने उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्याची मागणी पक्षाच्या वतीने सोमवारी करण्यात आली. तथापि, न्यायालयाने त्यास नकार दिला. वंचितने गॅस सिलेंडर या चिन्हावर लोकसभा आणि विधानसभा निवडणुका लढवल्या आहेत. परंतु राज्य निवडणूक आयोगाने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी मुक्त चिन्हांच्या यादीत गॅस सिलिंडर या चिन्हाचा समावेश करण्याचा निर्णय घेतला आहे.

त्यामुळे, वंचितच्या वतीने उच्च न्यायालयात याचिका करण्यात आली आहे.

मुख्य न्यायमूर्ती चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अखंड यांच्या खंडपीठासमोर वंचितची याचिका सोमवारी सुनावणीसाठी आली. त्यावेळी, पक्षाच्या वतीने वकील प्रकाश आंबेडकर यांनी याचिका करण्यामागील कारण स्पष्ट केले. तसेच, याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्याची मागणी केली.

गेल्या शुक्रवारी देखील याचिका सादर करण्यात आली होती व याचिकेवर तातडीची सुनावणी गरजेची असल्याचे सांगण्यात आले होते हे आंबेडकर यांनी न्यायालयाच्या निर्दशनास आणून दिले. तथापि, सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका डिसेंबरमध्ये होणार असल्याकडे लक्ष वेधून न्यायालयाने वंचितच्या याचिकेवर तातडीने सुनावणी घेण्यास नकार दिला.

महाराष्ट्र राज्य पक्ष नोंदणी, नियमन आणि निवडणूक चिन्ह (आरक्षण आणि वाटप) आदेशात नमूद केलेल्या अटींनुसार, एखाद्या नोंदणीकृत राजकीय पक्षाने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या (पंचायत समिती व्यतिरिक्त) मागील सार्वत्रिक निवडणुकीत एकूण जागांपैकी किमान पाच टक्के जागा जिंकल्या असतील किंवा त्या स्थानिक स्वराज्य संस्थेतील एकूण जागांपैकी पाच टक्के जागा एका जागेपेक्षा कमी असतील आणि जर त्या पक्षाच्या उमेदवाराने किमान एक जागा जिंकली असेल, तर त्या पक्षाच्या विनंतीवरून, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी पक्षासाठी एक मुक्त चिन्ह तात्पुरते राखीव म्हणून घोषित केले जाईल. ते मुक्त चिन्ह त्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत इतर कोणत्याही उमेदवाराला वाटप केले जाणार नाही.








लातूर शहर महानगरपालिकेचे आयुक्त श्रीमती मानसी, अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपयुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांना दैनिक महावृत्त या दीप उत्सवाचा अंक देत असताना अशोक हनवते संपादक दैनिक महावृत्त तथा जिल्हा सरचिटणीस महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई जिल्हा शाखा लातूर



## The 02 क्लोथिंग शॉपची शानदार ओपनिंग



यशवंतराव चव्हाण चौक आंबेजोगाई येथे प्रोप्रायटर: ऋचा जगन सरवदे यांच्या शॉप चे शानदार उद्घाटन केज विधानसभा विद्यमान आमदार : नमिता ताई अक्षय मुंदडा यांच्या प्रमुख उपस्थितीत शानदार उद्घाटन सोहळा उत्साहात संपन्न झाला त्यावेळी दैनिक महावृत्त (सहसंपादक): कल्याणराव हनवते आणि आरपीआय चेंबूर विभाग धडाडीचे कार्यकर्ते आयु. गंगाधर हनवते उपस्थित होते.

## घनकचरा व्यवस्थापन कामाची आयुक्त श्रीमती मानसी यांच्याकडून पाहणी





लातूर/प्रतिनिधी :- शहर महानगरपालिकेच्या आयुक्त श्रीमती मानसी यांनी स्वच्छता विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेऊन वरवंटी कचरा डेपो येथील कचरा प्रक्रिया केंद्रास भेट दिली. कामकाजाची पाहणी केली.

वरवंटी कचरा डेपो येथे सुरू असलेल्या ओला कचरा प्रक्रिया, सुका कचरा प्रक्रिया, बायोगॅस व इतर कामाची पाहणी करुन त्यांनी समाधान व्यक्त केले. पाहणी दरम्यान ओल्या कचऱ्या पासून बायोगॅसद्वारे तयार होणा-या विजेचा वापर व त्याचे योग्य नियोजन करण्याच्या सूचना केल्या. दैनंदिन जमा होणा-या ओला व सुका कच-यावर प्रक्रिया होऊन त्याची शास्त्रोक्त पद्धतीने विल्हेवाट लावावी व त्याचा सविस्तर अहवाल सादर करण्याच्या सूचना केल्या.

सदरील पाहणी दरम्यान उपायुक्त वसुधा फड, मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे, कनिष्ठ अभियंता गणेश देवणीकर,वरवंटी कचरा डेपो प्रमुख आशिष साठे, शहर समन्वयक रोहित पांचाळ व अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## लातूर शहरात दामीनी पथकाच्या तात्काळ मदतीमुळे मुलीवरील अतिप्रसंग टळला.

### दामिनी पथकाचे सर्व स्तरातून कौतुक

लातूर :- लातूर शहरात दामीनी पथकाच्या तात्काळ मदतीमुळे मुलीवरील अतिप्रसंग टळला.



याबाबत अधिक माहिती अशी की, दि.१८/११/२०२५ रोजी सकाळी १०.३० वा.वे सुमारास दामीनी पथक शहरात पेट्रोलींग करीत असताना एका सतर्क नागरीकाने फोन करून एक कॉलेजची मुलगी रडत असून एक मुलगा तिला चाकुने हात कापतो व तुझे नाव घेतो असे म्हणत त्या मुलाने मुलीला एका हॉटेलमध्ये नेले असल्याची माहीती दिली.

घटनेचे गांभीर्य ओळखुन माहीती प्राप्त होताच ७ ते ८ मिनीटांमध्ये दामीनी पथकाने सदर ठिकाणी जावुन पिडीत मुलगी व आरोपी मुलास ताब्यात घेऊन पोस्टे शिवाजी नगर येथे हजर केले. पिडीतेकडे घटनेच्या अनुशंगाने विचारपुस केली असता तिने सांगीतले की, आरोपी विशाल वाळासाहेब केकान, रा. केकानबाडी, ता. केज, जि.बीड हा पिडीतेस व्हॉटसअप व फोनद्वारे कॉल व मॅसेज करून त्रास देत असून आजही त्याने माझा जीव देतो असे म्हणुन इमोशनल ब्लॅकमेल करून अक्षय स्विमींगपुल जवळ, अंबाजोगाई रोडवर बोलावून घेवून माझे तुझ्यावर प्रेम आहे, मी रूम बुक केली आहे असे म्हणुन तिच्या हाताला धरून तु माझे सोबत चल नाही तर मी हात कापतो व तुझे नाव घेतो असे म्हणुन शिवीगाळ करून धमकी देवून तीस हॉटेलमध्ये घेवून जात होता असे सांगीतले. यावरून पिडीतेचा सविस्तर जबाब नोंदवून आरोपी विरुद्ध पोस्टे शिवाजी नगर येथे गुरनं. ४४५/२०२६ कलम ७४,७५,७८ (२),७९,३५२,३५१ (२) बीएनएस अन्वये गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सपोनि सुप्रीया केंद्र या करीत आहेत.

रस्त्यावर थांबलेल्या वाटसरूने प्रसंगाचे गांभीर्य ओळखुन दामीनी पथकास कॉल करून माहीती दिल्याने पुढील अनर्थ टळला असून याद्वारे लातूर शहरातील नागरीकाना, मुली व महिलांना आवाहन करण्यात येते की, रोडरोमीयो, टवाळखोर यांचेकडून त्रास होत असल्यास त्यानी दामीनी पथकाकडील मोबाईल नंबर ८८३०११५४०९ वर संपर्क करावा. तक्रार देण्याऱ्याची ओळख गोपनीय ठेवण्यात येईना.

सदरची कारवाई श्री. अमोल तांबे, पोलीस अधिक्षक, लातूर व श्री. मंगेश चव्हाण, अपर पोलीस अधिक्षक, लातूर यांचे मार्गदर्शनाखाली श्री. समीरसिंह साळवे, उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर व पोनि/अभिषेक शिंदे, दामीनी पथकातील पोलीस अंमलदार प्रशांत नागरगोजे, भाग्यश्री झोडपे, पल्लवी चिलगर यांनी केली आहे.

## आज घर हक्क संघर्ष समिती चा नवी मुंबई महानगरपालिकेवर धडक मोर्चा

-----------

आधुनिक भारताचे संविधान निर्माते प.पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा इतरत्र कुठेही उभा न करता नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिसरातच उभारण्यात आलाच पाहिजे..!

-----------

नवी मुंबई / के. एच. हनवते :-

घर हक्क संघर्ष समितीच्या वतीने दिनांक : १९/११/२०२५ रोजी दुपारी ०२ वाजता नवी मुंबई महानगरपालिकेवर घर हक्क संघर्ष समिती व समविचारी आंबेडकरवादी बहुजन जनतेच्या वतीने प्रचंड मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. सदर धडक मोर्चात आपल्या विविध नागरी समस्यांसोबत आपल्या घराचा ही मुख्य प्रश्न आहे. शासनाच्या जी आर नुसार २०११ च्या झोपडपट्टी धारकांना पात्र समजून त्याला योग्य ते निकष लावून व योग्य त्या कागद पत्रांची तपासणी करून त्यांचें हक्काचे घर त्यांना देण्यात यावे व झोपडपट्टीत राहणारे हे सर्व काबाडकष्ट करून पोट भरण्यासाठी आपले गाव सोडून शहरी भागात आलेले असतात अर्थात ते याच देशातील रहिवाशी आहेत ते ज्याही घरात राहतात त्या घरांची तोडक कारवाई रोखण्यात यावी व झोपडपट्टी धारकांना दिलासा द्यावा, दुसरी गोष्ट नवी मुंबईतील आंबेडकरी जनतेची बऱ्याच वर्षापासून मागणी आहे की जागतिक विद्वान असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे साऱ्या जगात सन्मानपूर्वक पुतळे उभारण्यात येत आहेत तशीच नव्या मुंबईची शान असलेल्या नवी मुंबई महानगरपालिकेच्या परिसरातच आधुनिक भारताचे संविधान निर्माते प.पु. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात आलाच पाहिजे..! तसेच नवी मुंबईत जे जे फेरीवाले व्यवसाय करतात त्यांचे ही विविध प्रश्न सोडविण्यासाठी घर हक्क संघर्ष समिती सदैव प्रयत्नशील आहे तरी समस्त बहुजन जनतेने शेकडोंच्या संख्येने उपस्थित राहावे ही नम्र विनंती.

या धडक मोर्चाचे आयोजन घर हक्क संघर्ष समीती, तसेच युवा संस्था इत्यादी सामाजिक संघटना यांनी सक्रीय सहभागी व्हावे असे जाहीर आव्हान घर हक्क संघर्ष समिती महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष कैलाश सरकटे यांनी केले आहे.

## संपादकीय

### काँग्रेस स्वबळावर!

बिहार निवडणुकीत भाजपचा दणदणीत विजय झाला तर काँग्रेसला दारुण पराभव स्वीकारावा लागला. याचे परिणाम आता राज्याच्या राजकारणावर होताना दिसत आहेत. वेगवेगळ्या स्तरांवर याबाबत चर्चा सुरू आहे. याच पार्श्वभूमीवर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत पडसाद उमटताना दिसत आहेत. मुंबईत काँग्रेसने स्वबळाचा नारा दिला आहे. आगामी महापालिका निवडणुकीत महाविकास आघाडीसोबत एकत्र न लढता स्वबळावर लढण्याची आग्रही मागणी पदाधिकारी, कार्यकर्त्यांकडून होत होती. त्याला अनुसरून मुंबईत शनिवारी झालेल्या काँग्रेसच्या शिबिरात यावर शिक्कामोर्तब झाले. मुंबई काँग्रेसचे एकदिवसीय शिबिर अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस व महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांच्या उपस्थितीत पार पडले. यावेळी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड उपस्थित होत्या. यावेळी प्रदेशाध्यक्ष सपकाळ म्हणाले, बिहार विधानसभेचे निकाल उलटे लागले असते तर आजचा उत्साह अधिक वाढला असता. पण पराभव झाला म्हणून खचून जाऊ नका. काँग्रेस कार्यकर्त्याने पुन्हा नव्या जोमाने व ताकदीने कामाला लागले पाहिजे. रडायचे नाही तर लढायचे, हा बाणा अंगी बाळगला पाहिजे.

मुंबई महानगरपालिका निवडणुकीत काँग्रेस पक्षाचा विजयी झेंडा फडकावण्यासाठी ताकदीने कामाला लागा, असे आवाहन सपकाळ यांनी कार्यकर्त्यांना केले. मुंबई महापालिकेतील सर्व वॉर्डांमध्ये काँग्रेस उमेदवार उभे करण्याची तयारी असल्याचे मुंबई काँग्रेसच्या अध्यक्षा खा. वर्षा गायकवाड यांनी सांगितले. त्या म्हणाल्या, लक्ष्य २०२६ साठी मुंबई काँग्रेसचे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. स्थानिक पातळीवर आघाडीबाबत निर्णय घ्यावा असे पक्षाने आम्हाला कळवले होते. येत्या काळात मुंबईत स्वबळावर लढले पाहिजे ही आमची भूमिका आहे. याशिवाय जे आमच्या समविचाराचे पक्ष असतील, त्यात आरपीआय गट अथवा राष्ट्रवादी काँग्रेस यांच्याशीही आम्ही या आघाडीबाबत चर्चा करू. राजकीय वर्तुळात मात्र यावर चांगलीच चर्चा रंगली आहे. बिहारच्या निवडणुकीनंतर हा निर्णय घेतला असावा का? उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांची युती काँग्रेसला खटकली का? यावर चर्चा होत आहे. परंतु याबाबत कुठलाही दावा अद्याप तरी काँग्रेसकडून करण्यात आलेला नाही. त्यामुळे यावेळच्या निवडणुकीत कोण कोणावर भारी पडणार ते पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

मुंबईतील काँग्रेसच्या कट्टर समर्थकांची मते कुठेही जाणार नाहीत. मात्र मनसेला सोबत घेऊन मुंबई महानगरपालिकेची निवडणूक लढवली तर दलित, उत्तर भारतीय, मुस्लिम मतदारांच्या नाराजीला सामोरे जावे लागेल. त्यामुळे मुंबई महानगरपालिकेची निवडणूक स्वबळावर लढण्याचा निर्णय काँग्रेस पक्षाने घेतला असावा. काँग्रेसचे प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी शनिवारी याबाबतची घोषणा केली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीआधीच महाविकास आघाडीत बिघाडी झाल्याची चर्चा आहे. काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला, मुंबई काँग्रेसचे प्रभारी यू. बी. वेंकटेश यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई काँग्रेसचे एकदिवसीय शिबिर शनिवारी मालाड येथे पार पडले. मतचोरी, मतदार यादीतील घोळ या मुद्यांवर मविआसोबत महाराष्ट्र नवनिर्माण सेना सहभागी झाली. राज्य निवडणूक आयोगाचे मुख्य अधिकारी यांची भेट घेण्यात आली त्यावेळी मविआसोबत मनसे अध्यक्ष राज ठाकरेही उपस्थित होते. दुसरीकडे मनसे-शिवसेना युतीची जोरदार चर्चा सुरू आहे.

मनसेसोबत शिवसेनेची युती झाली आणि मनसे मविआत सहभागी झाली तर आगामी निवडणुकीत मतांवर परिणाम होऊ शकतो असा विचार करून काँग्रेसने मुंबई महानगरपालिका निवडणूक स्वबळावर लढवण्याचा निर्णय घेतला असावा असा राजकीय विश्लेषकांचा अंदाज असावा. मविआच्या बैठकांचे सत्र सुरू असताना काँग्रेसने मुंबई महानगरपालिका निवडणुकीत 'एकला चलो रे'ची भूमिका घेतली आहे. काँग्रेस मुंबईची निवडणूक स्वबळावर लढेल. आम्ही सर्व २२७ जागा लढवू. जिल्हा काँग्रेस कमिटी, ब्लॉक काँग्रेस कमिटी आणि सर्व पदाधिका-यांची ही निवडणूक स्वबळावर लढण्याची इच्छा होती. त्यांच्या इच्छेचा मान राखत आम्ही हा निर्णय घेतला. ही स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक आहे. त्यामुळे या निवडणुकीत स्थानिक पातळीवरचे कार्यकर्ते जे म्हणतील तेच होईल. भविष्यात काँग्रेसला मजबूत बनवणे हे आमचे काम आहे. काँग्रेस मजबूत व्हावी अशी आमच्या कार्यकर्त्यांची इच्छा आहे. त्यामुळे आम्ही त्यांच्या भावनांचा मान राखत हा निर्णय घेतला आहे, असे चेन्नीथला म्हणाले. मविआमध्ये आम्ही किमान समान कार्यक्रमावर चालण्याचा प्रयत्न केला. हा कार्यक्रम सर्वांसाठी असला पाहिजे, संविधानाच्या धाग्यातून असला पाहिजे परंतु काही पक्षांची भूमिका ही मारहाणीची, लोकांना त्रास देण्याची राहिली आहे.

त्यामुळे काँग्रेस पक्ष म्हणून आम्ही त्यांच्यासोबत जाऊ शकत नाही. उद्धव ठाकरे यांचा स्वतंत्र पक्ष आहे. त्यांनी त्यांचा योग्य तो निर्णय घ्यावा. पण सध्या ते ज्या लोकांशी चर्चा करत आहेत, त्यांच्याशी आमचे कितपत जमेल ते आम्हाला माहिती नाही, असे काँग्रेसच्या मुंबई अध्यक्षा वर्षा गायकवाड यांनी म्हटले आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्ष पदाधिका-यांना आपल्याकडे वळवण्याचा प्रयत्न करत आहेत. अनेक ठिकाणी पक्षप्रवेश सोहळे पार पडत आहेत. अशात काँग्रेसमध्ये कुठेही बंडखोरी होणार नाही, असा विश्वास काँग्रेस नेते नाना पटोले यांनी व्यक्त केला आहे. बिहारमध्ये झालेला -हास पाहून काँग्रेसच्या नेत्यांनी बोध घ्यावा, तरीही त्यांना स्वबळावर निवडणूक लढवायची असेल तर लढवावी. त्यांना कोणी थांबवू शकत नाही असेही राजकीय वर्तुळात बोलले जात आहे.

# मेळघाटमधील कुपोषणामुळे मृत्यूचे वाढते प्रमाण गंभीर व चिंताजनक!

सरकार मेळघाटातमधील कुपोषण ग्रस्त भागात दुर्लक्ष करीत आहे हि बाब उच्च न्यायालयाने राज्य सरकारला फटकारल्यावरून स्पष्ट होते.आदिवासीबहुल मेळघाटात कुपोषणामुळे होणाऱ्या बालमृत्यूचा प्रकार भयावह व चिंताजनक आहे.असा संताप मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक १२ नोव्हेंबर २०२५ ला व्यक्त केला आणि या मुद्यावर सरकार बेजबाबदारपणाने काम करीत असल्याचे उच्च न्यायालयाने राज्य सरकारला चांगलेच फटकारले.मेळघाट परिसरात जून २०२५ ते आतापर्यंत शून्य ते सहा महिन्यांच्या वयोगटातील ६५ बालकांनी प्राण गमावले असे न्या.रेवती मोहिते डेरे आणि न्या.संदेश पाटील यांच्या खंडपीठाने नोंदवले व असेही सांगण्यात आले की हा भयावह प्रकार आहे,सरकारने याबाबत चिंता दाखविली पाहिजे असे न्यायालयाने म्हटले आहे.आपण म्हणतो की महाराष्ट्र विकासाच्या मार्गावर जात ही बाब सत्य आहे.परंतु राज्यातील अती दुर्गम भाग आजही अत्यंत पिछाडीवर आहे आणि हा प्रकार मेळघाटमध्ये वाढत्या बालमृत्यूच्या प्रमाणावरून स्पष्ट दिसून येतो यावर सरकारने डोळ्यात तेल घालून काम करण्याची नितांत गरज आहे. मेळघाटात कुपोषणामुळे जूनपासून आतापर्यंत ६५ बालकांचा मृत्यू झाला ही बाब भयानक असुन अत्यंत चिंताजनक आहे. अमरावती जिल्ह्यातील आदिवासीबहुल मेळघाटात कुपोषणामुळे मुले, गर्भवती आणि स्तनपान करणाऱ्या मातांच्या मृत्यूंची संख्या वाढत असल्याची अनेक जनहित याचिका उच्च न्यायालयात दाखल करण्यात आल्या आहेत.या याचिकांवर न्या.रेवती मोहिते डेरे आणि न्या.संदेश पाटील यांच्या खंडपीठाची सुनावणी झाली.जूनपासून आतापर्यंत शून्य ते सहा महिने वयोगटातील ६५ बालकांचा कुपोषणामुळे मृत्यू होणे ही राज्यासाठी अत्यंत चिंताजनक आणि भयावह बाब आहे. सरकारने हे गांभीर्याने लक्षात घेतले पाहिजे, असे खंडपीठाने राज्य सरकारला सुनावले.राज्य सरकार सार्वजनिक आरोग्याच्या प्रश्नावर गंभीर नाही,अशीही टिप्पणी न्यायालयाने केली आहे.सरकार अनेक योजना राबवित असते परंतु राज्यातील मेळघाटात सारख्या अनेक दुर्गम भागाकडे लक्ष नसल्याचे मेळघाटाच्या वाढत्या कुपोषणाच्या मृत्यूवरून स्पष्ट दिसून येते.राज्यामध्ये अनेक सरकारे आलीत आणि गेलीत परंतु सर्वांनीच अती दुर्गम भागाकडे दुर्लक्ष केले आणि त्याचे प्रायश्चित्त आजही मेळघाटात सारख्या अती दुर्गम भागातील आदिवासी भागांमध्ये कुपोषणामुळे बालमृत्यूचे प्रमाण वाढल्याचे दिसून येते. आज देश स्वतंत्र होऊन ७८ वर्षे झालीत तरीही राज्यासह देशातील अनेक अती दुर्गम भागातील नागरिकांचे हाल बेहाल होतांना दिसतात. आजही अती दुर्गम भागात पुरेशा आरोग्य सुविधा उपलब्ध नाही, शिक्षणासाठी गावकऱ्यांना व विद्यार्थ्यांना आटापिटा करावा लागतो,रूग्णांना झोळीच्या सहाय्याने अनेक किलोमीटर अंतरापर्यंत रुग्णालयात पायदळ न्यावे लागते ही भयावह परिस्थिती राज्यासह भारतातील अनेक दुर्गम भागातील राज्यांमध्ये दिसून येते. त्यामुळे राज्यासह देशात सर्वच काही ठीक आहे असे म्हणता येणार नाही.अती दुर्गम भागातील परिस्थितीचा विचार करून नियुक्ती केलेल्या डॉक्टरांना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने सरकारने डॉक्टरांच्या प्रती पाऊले उचलली पाहिजेत व तेथील परिस्थिती सुधारण्यासाठी योग्य त्या उपाययोजना केल्या पाहिजेत.माझ्या मते सर्वच पक्षांचे राजकीय पुढारी अति दुर्गम भागात मुद्दाम दुर्लक्ष करतात कारण त्यांना याठीकाणी पाहिजे त्या प्रमाणात मतदान होत नसावे हे सुद्धा कारण राहु शकते यालाही नाकारता येत नाही.सरकारची यंत्रणा अति दुर्गम भागात विकसित झाली तर आदिवासी नागरिकांना योग्य लाभ अवश्य होईल.अतिशय दुर्दैवी परिस्थिती आहे की सरकार सार्वजनिक आरोग्याचा मुद्दा हलक्यात घेत आहेत मुख्यत्वे करून आदिवासी भागात हा अत्यंत चिंताजनक व गंभीर विषय आहे.यावर सरकारने गांभीर्याने लक्ष केंद्रित करून मेळघाटात सारख्या अति दुर्गम भागातील नागरिकांना योग्य न्याय देऊन त्यांच्या आरोग्याची काळजी घेण्याची गरज आहे.जय हिंद.

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# मिशन महाराष्ट्र



स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या भूमीवर भारतीय जनता पक्षाचा झेंडा गुजरातप्रमाणे उभा राहावा, यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याचा विडा प्रदेश भाजपने उचलला आहे. स्वपक्षाची मोहोर या झंझावातात राहावी यासाठी विरोधी पक्षांसह महायुतीत असलेल्या पक्षांनाही मेहनत करावी लागणार आहे.

बिहार विधानसभा निवडणुकीतील निकालाच्या यशाने भारतीय जनता पक्षाला नवे बळ दिले आहे. या पक्षाचा प्रचंड आत्मविश्वास लोकसभेत ४०० जागा पार करता न आल्याने काहीसा हलला होता. तो बिहारच्या निकालांनी परत आला. भारताच्या हिंदी भाषिक पट्ट्यात भाजप अत्यंत जोमाने वाढतो आहे. या हिंदी आधाराला जोड देण्याचे काम ज्या राज्यांनी करायची आहेत, त्यात महाराष्ट्राचा क्रमांक फार वरचा आहे. त्यामुळे येथील स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका पक्षासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. विधानसभा निवडणुकीने भाजपला जे निर्णायक यश मिळवून दिले, त्याची पुनरावृत्ती करण्यासाठी सध्या भाजपचे राजकीय कौशल्य पणाला लागले आहे. महाराष्ट्राच्या भूमीवर पक्षाचा झेंडा गुजरातप्रमाणे उभा राहावा, यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्याचा विडा प्रदेश भाजपने उचलला आहे. प्रत्येक पक्षाला विस्ताराचा हक्क असतो. भाजप तो हक्क प्रत्यक्षात आणण्यासाठी जीवाचे रान करताना दिसतो. त्यांना रोखत स्वपक्षाची मोहोर या झंझावातात राहावी, यासाठी विरोधात बसलेल्या पक्षांनाच नव्हे तर महायुतीत असलेल्या पक्षांनादेखील मेहनत करावी लागणार आहे.

स्वातंत्र्योत्तर काळात 'सब भूमी गोपाल की' यांसारखे सगळे लोकप्रतिनिधी काँग्रेसचे असे चित्र होते. ते चित्र झपाट्याने बदलण्यासाठी भाजपने अहोरात्र काम केले. या प्रयत्नांना कर्नाटक वगळता दक्षिणेत यश मिळालेले नाही. पंजाब, जम्मू-काश्मीरसारखी राज्येही अद्याप प्रभावात आलेली नाहीत. महाराष्ट्र हा तसा काँग्रेसचा बालेकिल्ला. तो पादाक्रांत करण्यासाठी भाजपने हाती घेतलेली राजकीय मोहीम बर्याच प्रमाणात यशस्वी झाल्यानंतर आता त्याचे पुनर्प्रयोग स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत भाजप करेल.

महाराष्ट्राचा राजकीय नकाशा पाहिला तर भाजप जिथे शक्य आहे, तिथे पराभूत झालेल्यांना आपल्यात सामावून घेतो आहे. पश्चिम महाराष्ट्रातल्या सांगली विधानसभा निवडणुकीत क्रमांक दोन आणि तीनवर राहिलेले जयश्री पाटील आणि पृथ्वीराज पाटील भाजपत आले. आमदार सुधीर गाडगीळ यांनीदेखील त्यांचे येणे आपले मानून घेतले. या प्रयोगाची पुनरावृत्ती नाशिक येथेही झाली. काँग्रेसशी असलेली निष्ठा सोडून शिरीष कोतवाल भाजपत आले आणि आमदार राहुल आहेर यांनी त्यांचे मनःपूर्वक स्वागतही केले. मुंबईत अतुल भातखळकर यांना पराभूत करणारे ठाकूर भाजपत आले आणि त्यांचे स्वागत केले गेले. विरोधकांना वश करण्याची नवी मोहीम भाजपने सुरू केली आहे.

महाराष्ट्रात आर्थिक सत्ता राखायची असेल तर सरकार शरण जाणे आवश्यक मानले जाते आहे. पूर्वीही असेच होते. पण वैचारिक बांधिलकी घट्ट असेल तर नेते नकार देत. उभे राहून विरोध करत. आता भाजपत समाविष्ट होताना निवडणूक जिंकायची संधी मिळाली नाही तर निदान सत्तेचे लाभ मिळतील, कंत्राटाचे लाभार्थी होता येईल, असे राजकारण्यांना वाटू लागले आहे. अर्थात याबरोबरच आपल्या मूळ पक्षात आता शक्ती राहिलेली नाही याचीही जाणीव सहा-सहा वेळा आमदार राहिलेल्या नेत्यांना होऊ लागल्यामुळेच हे पक्षांतर होते आहे. भाजप महाराष्ट्राच्या राजकीय पटलावर स्वतःचे सामर्थ्य कसे अधोरेखित करेल याकडे निवडणुकीच्या निमित्ताने राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

सध्या भाजपच्या तोडीस तोड असा विशिष्ट भागामध्ये शक्ती असलेला सर्वात महत्त्वाचा पक्ष म्हणजे एकनाथ शिंदे यांचा. शिंदे यांनी एकेकाळी शिवसेना वाढवली. ते शिवसेनेचे सरदार होते. आता तेच स्वतंत्र संस्थानाचे निर्माते झाले. ठाणे-कल्याण भागातील वर्चस्व कायम ठेवण्यासाठी ते प्रयत्न करतील. भाजपलाही या भागात विस्तार करायचा असल्यामुळे मुंबई परिसरात परस्परांशी कसे वागले जाईल ते सर्वात लक्षवेधी.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी 'मित्र पक्षांना दुखवू नका, त्यांना शक्यतो बरोबर ठेवा', असे सांगितले होते, असे म्हणतात. पण युतीतील अन्य पक्षात एकमेकांचे लोक खेचण्याची स्पर्धा सुरू केली तेव्हा हा युती धर्म नव्हे, असे फडणवीस यांनी समजावून सांगितले. पण आपण या धर्माचे पालन केले तरी अन्य सहकारी ते करतीलच असे नाही, असे लक्षात आल्यावर भाजपचे दरवाजे खुले झाले आणि आता महायुतीतील घटक पक्षांची वर्चस्वासाठी स्पर्धा सुरू झाली. हे सामने अत्यंत चित्तथरारक असतील. ते कटूता निर्माण न होता लढले जातील का, ते पाहणे मनोरंजक ठरणार आहे.

भाजपला साथ देणारा अजित पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा देखील पश्चिम महाराष्ट्रात स्वतःचे अस्तित्व टिकवून ठेवणे आणि वाढवणे यासाठी परिश्रम करतो आहे. त्यासाठी वेळप्रसंगी शरद पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसशी हातमिळवणी करण्याचेही ठरले आहे. ते प्रत्यक्षात येते का हे दिसेल. उद्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीतल्या पहिल्या टप्प्याचे अधिकृत उमेदवार कोण ते कळेल. युती होते आहे की नाही ते लक्षात येईल. कोल्हापूर जिल्ह्यात वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ आणि पूर्वाश्रमीचे भाजपचे आणि सध्या राष्ट्रवादी शरद पवार गटत असलेले नेते समरजितसिंह घाटगे यांच्यातील राजकीय वैर संपावे यासाठी खुद्द मुख्यमंत्री फडणवीस यांनी आघाडी घेतली आहे.

प्रत्येक नगर परिषद महत्त्वाची मानून शक्य आहे तिथे भारतीय जनता पक्षाने ती जिंकावी यासाठी प्रयत्न सुरू झाले आहेत. या प्रयत्नात नगराध्यक्ष पदासाठी उत्तम उमेदवार दिले गेले आहेत. जिथे आमदार या उमेदवारांना सहाय्य करणार नाही, तिथे त्यांना रोखण्यासाठी पक्षाने यंत्रणा उभी केली आहे. भाजप हा संघटनात्मक पातळीवर चालतो की आमदार झालेल्या नेत्यांच्या करिष्म्यावर हे

# गरमागरम पदार्थांनी करा दिवसाची सुरुवात! १० मिनिटांमध्ये बनवा गाजर टोमॅटोचे चविष्ट सूप, नोट करून घ्या रेसिपी



हिवाळ्यात थंडीच्या गारव्यामुळे शरीराची रोगप्रतिकारशक्ती कमी होऊन जाते. वातावरणात होणाऱ्या बदलांच्या परिणामामुळे आरोग्य बिघडते. वारंवार सर्दी, खोकला, थंडी, ताप इत्यादी अनेक समस्या उद्भवून शरीराच्या कार्यात अडथळे निर्माण होतात. शरीराची ऊर्जा वाढवण्यासाठी वेगवेगळ्या पदार्थांचे सेवन करण्याचा सल्ला कायमच दिला जातो. आज आम्ही तुम्हाला सकाळच्या नाश्त्यात गाजर टोमॅटो सूप बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. थंडीच्या दिवसांमध्ये प्रामुख्याने टोमॅटो सूप बनवून प्यायले जाते. टोमॅटो सूप प्यायल्यामुळे शरीरात उष्णता टिकून राहते आणि आरोग्य बिघडत नाही. जेवणातील सर्वच पदार्थ बनवताना टोमॅटोचा वापर केला जातो. आंबट गोड चवीचा टोमॅटो शरीराची रोगप्रतिकारशक्ती सुधारण्यास मदत करतो. यासोबतच यामध्ये असलेले विटामिन सी त्वचा आणि आरोग्यासाठी गुणकारी आहेत. गाजर आणि टोमॅटोमध्ये विटामिन ए भरपूर असते. चला तर जाणून घेऊया गाजर टोमॅटो सूप बनवण्याची सोपी रेसिपी. (फोटो सौजन्य –डब्यात कायम त्याच ठराविक भाज्या खाऊन कंटाळा आला असेल तर झटपट बनवा गवारीचा झणझणीत ठेचा, नोट कर चटकदार रेसिपी

कृती:

गाजर टोमॅटो सूप बनवण्यासाठी सर्वप्रथम, कुकरच्या भांड्यात स्वच्छ धुवून घेतलेला गाजर आणि टोमॅटोचे तुकडे घाला. भाज्या शिजण्यासाठी १ ग्लास पाणी घालून कुकरचे झाकण लावून ठेवा.

कुकरच्या ५ ते ६ शिट्ट्या झाल्यानंतर गॅस बंद करून गाजर आणि टोमॅटो थंड होण्यासाठी ठेवा. मिक्सरच्या भांड्यात थंड झालेल्या भाज्या घालून बारीक पेस्ट बनवा आणि तयार केलेली पेस्ट गाळून घ्या.

टोपात तूप किंवा तेल टाकून तयार केलेली पेस्ट घालून व्यवस्थित मिक्स करा. आवश्यकता वाटल्यास पाणी घालून उकळी काढा.

उकळी आल्यानंतर त्यात काळीमिरी पावडर, चवीनुसार मीठ आणि साखर घालून व्यवस्थित मिक्स करा. सूपला उकळी आल्यानंतर गॅस बंद करून घ्या.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले गाजर टोमॅटोचे सूप. हा पदार्थ सकाळच्या नाश्त्यासाठी अतिशय उत्तम आहे.

# हिवाळ्यात 'या' पद्धतीने करा ताज्या आवळ्याचे सेवन! गंभीर आजारांपासून राहाल कायमच दूर, त्वचेवर येईल चमकदार ग्लो

आवळ्याचे सेवन केल्यामुळे शरीराला भरमसाट फायदे होतात. यासोबतच रक्तात वाढलेली साखर नियंत्रणात राहते आणि कोलेस्ट्रॉलचा धोका कमी होऊन जातो. जाणून घ्या आवळा खाण्याचे फायदे.

थंडीत कोणत्या पदार्थांचे सेवन करावे?

रोगप्रतिकारशक्ती सुधारण्यासाठी कोणते फळ खावे?

आवळा खाण्याचे फायदे?

राज्यासह संपूर्ण देशभरात कडाक्याची थंडी पडली आहे. थंडीच्या दिवसांमध्ये शरीराची खूप जास्त काळजी घ्यावी. संतुलित आहार, भरपूर पाण्याचे सेवन, शारीरिक हालचाली, कमीत कमी ताण घेतल्यास सर्वच ऋतूंमध्ये शरीर कायमच निरोगी राहील. थंडीच्या दिवसांमध्ये शरीराची कमकुवत झालेली रोगप्रतिकारशक्ती सुधारण्यासाठी आवळ्याचे सेवन करावे. लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं तुरट चवीचा आवळा खायला खूप जास्त आवडतो. आवळ्यापासून अनेक वेगवेगळे पदार्थ बनवले जातात. आवळ्याचे लोणचं, आवळ्याची आमटी, आवळ्याचं मुरंबा इत्यादी अनेक पदार्थ बनवले हातात. सकाळी उठल्यानंतर उपाशी पोटी आवळ्याचे सेवन केल्यास शरीरात साचून राहिलेले विषारी घटक बाहेर पडून जातात आणि शरीर स्वच्छ होते. आवळ्याला नैसर्गिक टॉनिक मानले जाते. सर्वच ऋतूंमध्ये वेगवेगळ्या पद्धतीत आवळ्याचे सेवन केले जाते.(फोटो सौजन्य – ळींलज्ञ)



कच्चा आवळा चवीसोबत शरीरासाठी अतिशय गुणकारी ठरते. रक्तात वाढलेली साखर, कोलेस्ट्रॉल कमी करण्यासाठी सकाळी उठल्यानंतर कोमट पाण्यात आवळ्याची पावडर मिक्स करून प्यावी. यामुळे आतड्यांमध्ये साचून राहिलेले विषारी घटक बाहेर पडून जातात आणि शरीर स्वच्छ होते. लहान मुलांना आवळा खायला आवडत नाही. अशावेळी तुम्ही मुलांसाठी आवळ्याची कोशिंबीर बनवू शकता. आवळा कोशिंबीर बनवण्यासाठी किसलेल्या आवळ्यामध्ये आलं, खडीसाखर, मध आणि काळीमिरी पावडर आणि जिऱ्याची पावडर घालून व्यवस्थित मिक्स करा. या पद्धतीने बनवलेली आवळ्याची कोशिंबीर चवीला अतिशय सुंदर लागते.

आवळ्यापासून बनवला जाणारा अतिशय प्रसिद्ध पदार्थ म्हणजे मोरावळा. हा एक गोड पदार्थ आहे. चवीला गोड लागणारा पदार्थ आरोग्यासाठी अतिशय प्रभावी आणि गुणकारी ठरतो. साखरेचा पाक करून त्यात आवळे भिजत ठेवा. ४ ते ५ दिवसानानंतर आवळे पाकामध्ये छान मुरले जातील. तसेच आवळ्यापासून तुम्ही आवळा कँडी, चटणी इत्यादी पदार्थ बनवून रोजच्या आहारात सेवन करू शकता. आवळ्यापासून बनवलेल्या पदार्थांचा रोजच्या आहारात समावेश केल्यास शरीराला अनेक फायदे होतात आणि तुम्ही कायमच निरोगी राहता.

शरीराची बिघडलेली पचनक्रिया सुधारण्यासाठी आहारात आवळ्याचा समावेश करावा. फायबर युक्त आवळ्याचे नियमित सेवन केल्यास शरीरातील विषारी घटक बाहेर पडून जाण्यासोबत शरीराची पचनक्रिया सुद्धा सुधारेल. यामध्ये अँटी ऑक्सिडंट्स, कॅल्शियम, लोह आणि फॉस्फरस, पोटॅशियम आणि अमिनो आम्ल इत्यादी अनेक घटक आढळून येतात. शरीराच्या पेशींचे कार्य सुधारण्यासाठी आवळ्याचे सेवन करावे. थंडीच्या दिवसांमध्ये आवळ्याचे सेवन करणे शरीरासाठी वरदान मानले जाते. यामध्ये असलेल्या विटामिन सी मुळे रोगप्रतिकारशक्ती सुधारण्यासोबतच शरीराला भरपूर ऊर्जा मिळते. थंडीच्या दिवसांमध्ये शरीराला बळ आणि ऊर्जा देण्यासाठी आवळ्याचे सेवन करावे.

टीप – हा लेख केवळ सामान्य माहितीसाठी लिहिण्यात आला असून कोणत्याही प्रकारच्या उपचाराचा दावा यामध्ये करण्यात आलेला नाही. कोणताही उपाय करण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# थंडीच्या दिवसांमध्ये केस धुवण्यासाठी कोणते पाणी वापरावे? 'या' पद्धतीने घ्या केसांची काळजी, केस कायमच राहतील मुलायम

थंडीच्या दिवसांमध्ये केस धुवण्यासाठी कोमट पाण्याचा वापर करावा. कोमट पाण्याच्या वापरामुळे केसांच्या समस्या कमी होण्यासोबतच केसांमधील नैसर्गिक तेल कायम टिकून राहते आणि केस अतिशय सुंदर दिसतात.

राज्यासह संपूर्ण देशभरात सगळीकडे कडाक्याची थंडी पडली आहे. थंडीच्या दिवसांमध्ये आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. कारण वातावरणात होणाऱ्या बदलांचा परिणाम थेट शरीर, त्वचा आणि केसांच्या आरोग्यावर होण्याची जास्त शक्यता असते. थंडीच्या दिवसांमध्ये त्वचेसोबतच केस सुद्धा खूप जास्त कोरडे होऊन जातात. केसांचे आरोग्य बिघडल्यानंतर सुधारण्यासाठी अनेक प्रयत्न करावे लागतात. केस स्वच्छ आणि निरोगी ठेवण्यासाठी आठवड्यातून दोनदा हेअर वॉश करणे आवश्यक आहे. केस शॅम्पूचा वापर करून स्वच्छ धुतल्यास टाळूवरील घाण आणि कोंडा कमी होण्यास मदत होते. थंडीच्या दिवसांमध्ये गारठ्यामुळे गरम पाण्याची अंघोळ केली जाते. पण बऱ्याचदा केस स्वच्छ करण्यासाठी थंड की गरम पाण्याचा वापर करावा, यात महिला खूप जास्त गोंधळून जातात. काहींना वाटत थंड पाणी प्रभावी आहे तर काहींना वाटत गरम पाणी प्रभावी आहे. चुकीच्या पद्धतीने केस धुतल्यास



केसांची गुणवत्ता खराब होऊन केसांची पोत बिघडते.(फोटो सौजन्य –

चुकीच्या पाण्याचा वापर केल्यास केस झाडूसारखे अतिशय कोरडे आणि निस्तेज होऊन जातात. केसांमध्ये फ्रिजीनेस वाढून केसांच्या बऱ्याच समस्या उद्भवू लागतात. आपल्यापैकी अनेक महिला केस धुवण्यासाठी गरम पाण्याचा वापर करतात. पण डॉक्टरांच्या मते केस स्वच्छ करण्यासाठी गरम पाण्याचा वापर केल्यास केसांचे आरोग्य आणि चमक कायम टिकून राहत नाही. केस अतिशय कोरडे आणि निस्तेज होऊन जातात. तसेच केसांमधील नैसर्गिक तेल कमी होऊन केसांची गुणवत्ता खराब होऊन जाते. पण थंड पाण्याचा वापर करून केस धुतल्यास केसांना कोणतीही हानी पोहचत नाही. केसांमधील नैसर्गिक चमक कायम टिकून राहते आणि केस सुंदर दिसतात. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला केस धुवण्यासाठी थंड की गरम कोणत्या पाण्याचा वापर करावा? याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत.

थंडीच्या दिवसांमध्ये केस धुवण्यासाठी कोणत्या पाण्याचा वापर करावा?

थंडीच्या दिवसांमध्ये खूप जास्त थंड आणि खूप जास्त गरम पाण्याचा वापर केल्यास केसांच्या आरोग्यासाठी धोक्याचे ठरू शकते. थंडीत केस धुवण्यासाठी प्रामुख्याने कोमट पाण्याचा वापर करावा. अतिथंड किंवा अतिगरम पाणी वापरू नये. ३५ ते ४० अंश सेल्सिअस तापमान असलेले कोमट पाणी केसांसाठी फायदेशीर आहे. यामुळे केसांचे कोणतेही नुकसान होत नाही आणि केस कायमच सुंदर राहतात.

हिवाळ्यात आठवड्यातून दोनदाच केस धुवावे. जास्त वेळा केस धुवू नये. कारण यामुळे डोकेदुखी किंवा सर्दी होण्याची जास्त शक्यता असते. वारंवार केस धुतल्यामुळे केसांमधील नैसर्गिक तेल कमी होऊन जाते आणि केस अतिशय रुक्ष होतात. केस धुवण्यासाठी मॉइश्चरायझिंग शाम्पू आणि कंडिशनरचा वापर करावा. शाम्पूचा वापर करून केस धुतल्यास शेवटी थंड पाण्याचा वापर करावा. थंड पाण्याच्या वापरामुळे क्यूटिकल्स बंद होण्यास मदत होते.

जपानी महिलांच्या सुंदर सिल्की केसांचे रहस्य! दैनंदिन वापरात 'या' गोष्टी फॉलो केल्यास होतील लांबलचक मजबूत केस

थंडीच्या दिवसांमध्ये केसांना हर्बल तेलाने मसाज करावा. हर्बल तेल केसांसाठी अतिशय गुणकारी ठरते . रात्री झोपण्याआधी केसांना तेल लावून हलक्या हाताने मालिश करावी. यामुळे केसांना पोषण मिळते आणि केसांच्या समस्या उद्भवत नाही. केसांची काळजी घेताना कोमट पाण्याने केस धुवावे. केसांसाठी कोमट पाणी प्रभावी ठरते.

टींश: हिवाळ्यात केस कोरडे आणि निर्जीव का होतात?

–पी: हिवाळ्यात हवेतील आर्द्रता कमी होते आणि हवा खूप कोरडी असते. यामुळे आपल्या त्वचेप्रमाणेच केसांमधील नैसर्गिक ओलावा देखील कमी होतो.

टींश: हिवाळ्यात केस किती वेळा धुवावेत?

–पी: आठवड्यातून फक्त दोनदा केस धुणे पुरेसे आहे.

टींश: केस धुण्यासाठी गरम पाणी वापरावे की थंड?

–पी: हिवाळ्यात केस धुण्यासाठी कोमट पाणी वापरावे.


# दातांना लागलेली कीड होईल कायमची नष्ट! रामदेव बाबांनी सांगितलेला 'हा' उपाय ठरेल प्रभावी, तोंडाच्या दुर्गंधीपासून मिळेल कायमची सुटका

दातांना लागलेली कीड नष्ट करण्यासाठी बाबा रामदेव यांनी सांगितलेला आयुर्वेदिक आणि घरगुती उपाय करून पाहावा. यामुळे पायरिया आणि हिरड्यांच्या सर्वच समस्यांपासून कायमचा आराम मिळेल.

बऱ्याचदा कामाच्या धावपळीमधून आरोग्याकडे लक्ष देण्यासाठी जास्तीचा वेळ मिळत नाही. चेहऱ्याची ज्याप्रमाणे काळजी घेतली जाते तशी काळजी ओरल हेल्थची घेतली जात नाही. दातांमध्ये वेदना, हिरड्यांमधून रक्त किंवा दातांमध्ये कमकुवतपणा वाढून दात पूर्णपणे खराब होऊन जातात. सतत गोड किंवा अतिचिकट, कडक पदार्थांचे सेवन केल्यामुळे दातांचे आरोग्य बिघडून जाते. याशिवाय दातांवर साचून राहिलेल्या पिवळ्या थरामुळे चारचौघांमध्ये गेल्यानंतर महिलांचा आत्मविश्स्वास काहीसा काही कमी होऊन जातो. त्यामुळे दातांची काळजी घेणे आवश्यक आहे. अनहेल्दी खाणे, जास्त जंक फूडचे सेवन करणे, गोड पदार्थ खाणं, स्मोकींग आणि चुकीच्या पद्धतीने दात स्वच्छ करणे, दातांच्या आरोग्याकडे व्यवस्थित लक्ष न दिल्यामुळे दातांच्या समस्या वाढून दातांना कीड लागते. (फोटो सौजन्य – ळींलज्ञ)

दातांना कीड लागल्यानंतर दातांमध्ये तीव्र वेदना होतात. काहीवेळा या वेदना वाढू लागतात. दात आणि हिरड्या कमकुवत झाल्यानंतर बऱ्याचदा पेनकिलरच्या गोळ्यांचे सेवन केले जाते. पण वारंवार पेनकिलरच्या गोळ्या खाणे आरोग्यासाठी अतिशय घातक ठरते. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला दातांना लागलेली कीड नष्ट करण्यासाठी रामदेव बाबांनी यांनी सांगितलेले काही सोपे आणि घरगुती उपाय सांगणार आहोत. हे उपाय केल्यामुळे दातांचे आरोग्य सुधारते आणि दातांच्या समस्या कमी होऊन जातात. दात मजबूत होण्यासाठी आहारात कॅल्शियम युक्त पदार्थांचे सेवन करावे. यामुळे दात मजबूत आणि निरोगी राहतात.

दातांची किड स्वच्छ करण्यासाठी कोणता उपाय करावा?



दातांना लागलेली कीड नष्ट करण्यासाठी आघाडा वनस्पतीचा वापर करावा. या वनस्पतीला लटजीरा किंवा चिरचिटा असे सुद्धा म्हणतात. ही वनस्पती प्रामुख्याने जंगलांमध्ये आणि मोकळ्या परिसरामध्ये दिसून येते. पण आघाडा वनस्पतीची ओळख नसलेली लोक याकडे कायमच दुर्लक्ष करतात. दातदुखी, पायरीया, हिरड्यांची कमजोरी इत्यादी सर्वच समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी या वनस्पतीचे सेवन करावे. दातांना आलेली सूज आणि वेदना कमी करण्यासाठी आघाडा वनस्पतीचा वापर करावा. पायरियाचा त्रास झाल्यानंतर हिरड्यांना सूज येऊन वेदना होतात. तसेच अन्नपदार्थ चावण्यासाठी सुद्धा खूप जास्त त्रास होतो. या वनस्पतीच्या वापरामुळे हिरड्यांना आलेली सूज, वेदना कमी होण्यास मदत होईल.

कमी पाण्याचे सेवन करणे बेतू शकते जीवावर! शरीरात दिसून येतात पाण्याच्या कमतरतेची 'ही' गंभीर लक्षणे, वेळीच व्हा सावध

दातांच्या वेदनांपासून आराम मिळवण्यासाठी आघाडा वनस्पती पूर्णपणे बारीक पावडर करून घ्या. एक लिटर पाण्यात तयार केलेली पावडर उकळवण्यासाठी ठेवा. त्यानंतर पाणी उकळून अर्धा झाल्यानंतर गॅस बंद करा. तयार केलेल्या पाण्याच्या दिवसभरातून दोनदा किंवा तीनदा गुळण्या केल्यास दातदुखी, पायरिया, हिरड्यांच्या समस्या कमी होण्यास मदत होईल. तसेच तोंडात वाढलेली दुर्गंधी कमी करण्यासाठी ही वनस्पती अतिशय प्रभावी ठरते. बाबा रामदेव यांनी सांगितलेला उपाय करून पाहिल्यास दातांच्या बऱ्याच समस्यांपासून आराम मिळेल.

टीप – हा लेख केवळ सामान्य माहितीसाठी लिहिण्यात आला असून कोणत्याही प्रकारच्या उपचाराचा दावा यामध्ये करण्यात आलेला नाही. कोणताही उपाय करण्यापूर्वी आपल्या डॉक्टरांचा सल्ला घ्या.

टींश: दातांची स्वच्छता कशी करावी?

–पी: दिवसातून किमान दोनदा, सकाळी आणि रात्री झोपण्यापूर्वी ब्रश करा.

टींश: खाण्याच्या सवयींचा दातांवर कसा परिणाम होतो?

# अल्पवयीन मुलीला त्रास देणाऱ्या व विनयभंग करणाऱ्या आरोपीस गांधी चौक पोलिसांनी केली तात्काळ अटक.

लातूर :- अल्पवयीन मुलीला त्रास देणाऱ्या व विनयभंग करणाऱ्या आरोपीस तात्काळ अटक. व २० तासांत तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल. पोलिसांची अत्यंत वेगवान कारवाई

लातूर शहरातील गांधी चौक पोलीस ठाणे हद्दीत अल्पवयीन मुलीच्या छेडछाडीचा गंभीर प्रकार घडल्याची तक्रार दि. १७ नोव्हेंबर २०२५ रोजी प्राप्त झाली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता लातूर पोलिसांनी त्वरित, काटेकोर व संवेदी भूमिकेतून गांधी चौक पोलीस ठाण्याच्या पोलिसांनी कारवाई करून आरोपीस अटक केली. व केवळ २० तासांच्या अल्पावधीत तपास पूर्ण करून आरोपपत्र दाखल करण्याचे उल्लेखनीय कार्य पार पाडले.

पीडित अल्पवयीन मुलीने दिलेल्या तक्रारीनुसार दि. १७/११/२०२५ रोजी दुपारी साधारण २.३० वाजता आरोपी इसराईल कलीम पठाण, वय २७ वर्षे, रा. गौसपुरा, लातूर हा फिर्यादीच्या घरात अनधिकृतरीत्या शिरला व पीडित मुलीस जबरदस्ती करून हात धरून विनयभंग केला.तसेच यापूर्वीही आरोपीने पीडित मुलीचा वारंवार पाठलाग केला होता.तिच्या कुटुंबीयांना जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या होत्या.

पीडित मुलीला व तिच्या कुटुंबीयांना वाढत्या त्रासामुळे मानसिक दबाव निर्माण झाला होता. तक्रार प्राप्त झाल्यानंतर



प्रकरण अत्यंत संवेदनशील मानून त्वरित गुन्हा नोंद करण्यात आला.

पोलीस स्टेशन गांधी चौक येथे गुन्हा क्रमांक ५३६/२०२५ कलम ७४, ७८, ३३३, ३५१(२)(३) - भारतीय न्याय संहिता (इछड) सह कलम ८, १२ - बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायदा (झजउड्ज -र्ली)अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला.

गुन्हा नोंद होताच पोलीस अधीक्षक, श्री. अमोल तांबे यांनी घटनेचा आढावा घेऊन त्वरित कारवाईचे निर्देश दिले. त्या अनुषंगाने अपर पोलीस अधीक्षक, श्री.मंगेश चव्हाण उपविभागीय पोलीस अधिकारी, श्री. समीरसिंह साळवे यांचे मार्गदर्शनात गांधी चौक पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक सुनील रेजितवाड यांनी तातडीने दोन स्वतंत्र शोधपथके तयार केली.त्या पथकांनी
आरोपीचे रहिवास व हालचालींची गुप्त माहिती गोळा केली, संभाव्य ठिकाणांची पाहणी करून आरोपी इसराईल कलीम पठाण यास स्थानिक पथकाने ताब्यात घेतले.आरोपीस ताब्यात घेऊन कायदेशीर अटक प्रक्रिया पूर्ण करण्यात आली.

तपास अधिकारी पोउपनि श्री गणेश चित्ते यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनात तत्परतेने तपास पूर्ण करून आरोपी विरुद्ध सबळ पुरावा संकलित करून आरोपीसह आवश्यक कागदपत्रांसह मा. न्यायालयात आरोपपत्र सादर करण्यात आले. वरील सर्व प्रक्रिया अत्यंत बारकाईने पार पाडून केवळ २० तासांत तपास पूर्ण करण्यात आला. ही संवेदनशील व वेगवान कारवाई पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे यांच्या सूचने व निर्देशावरून पथकामधील पोउपनि गणेश चित्ते, मपोउपनि श्रीमती पोवार, सफौ राजेंद्र टेकाळे, पोलीस अंमलदार प्रकाश भोसले, रविसन जाधव,राहुल दरोडे, सचिन चंद्रपाटले, योगेश चिंचोलीकर, रवि कानगुले, सचिन जाधव, शिवानंद गिरबोने, महिला पोलीस अंमलदार संध्या कांबळे, सुमन कोरे,लता बनसोडे, राखी गायकवाड यांनी केली आहे.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनात पथकाने तत्परतेने एक संवेदनशील प्रकरणात विलंब न होता आरोपीविरुद्ध कडक कायदेशीर कारवाई करण्यात आली असून लातूर पोलिसांची संवेदी, जलद आणि कायदेशीर कामगिरी केली आहे.
अल्पवयीन मुलीचे संरक्षण आणि न्यायप्रक्रियेतील पारदर्शकता.
गुन्हा नोंद होताच आरोपीची अटक करून बारकाईने तपास पूर्ण करून आरोपी विरुद्ध सबळ पुरावा हस्तगत करून गांधी चौक पोलीस ठाणे कडून अवघ्या २० तासांत आरोपपत्र मा. न्यायालयात दाखल करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी लातूर पोलीस दलाच्या संवेदी आणि नागरिक-केंद्रित कार्यपद्धतीचे प्रतीक असून लातूर पोलीसांकडून नागरिकांना आवाहन करण्यात येते की,अल्पवयीन मुलींवरील अत्याचार, छेडछाड, त्रास किंवा संशयास्पद हालचालींची तात्काळ पोलीसांना माहिती द्यावी.

## युसुफ वडगाव जिल्हा परिषद गटामध्ये राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीने हक्काचा उमेदवार द्यावा- उपाध्यक्ष प्रीतम खरात



केज/प्रतिनिधी -युसुफ वडगाव जिल्हा परिषद गटामध्ये राष्ट्रवादी कॉँग्रेस पार्टीने हक्काचा उमेदवार द्यावा अशी मागणी राष्ट्रवादी कॉँग्रेस अजित दादा पवार यांच्या पक्षाचे केज तालुका उपाध्यक्ष प्रितम खरात यांनी केले आहे. लवकरच राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पक्ष अध्यक्ष अजित दादा पवार यांच्यासह पक्षश्रेष्ठतील वरिष्ठांकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी करणार आहे असे प्रसिद्धीपत्रकाद्वारे प्रसारमाध्यमांना प्रीतम खरात यांनी माहिती दिली आहे. आगामी होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका संदर्भात जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक मध्ये राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाने युसुफ वडगाव जिल्हा परिषद गटामध्ये पक्षातीलच उमेदवार द्यावा जेणेकरून पक्षातील एखाद्या सर्वसामान्य कार्यकर्त्याला संधी भेटेल तसेच एखाद्या सुशिक्षित व नवीन नेतृत्वाला संधी भेटेल या दृष्टिकोनातून पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे,जिल्हाध्यक्ष राजेश्वर आबा चव्हाण यांना पत्रकार द्वारे मागणी करणार असल्याचे माहिती राष्ट्रवादी कॉँग्रेस अजित दादा पवार पक्षाचे केज तालुका उपाध्यक्ष प्रितम खरात यांनी दिली आहे. पक्षामध्ये काम करत असताना समाजकारण व राजकारण या जोडीला धरून शेतकऱ्यांचे तथा सामाजिक प्रश्न यावर नेहमी काम करणारे चळवळीतील जे नेतृत्व असतात त्यांना संधी पक्षाने देणे गरजेचे आहे जेणेकरून पक्षाचे ताकद वाढेल या दृष्टिकोनातून पक्षाने उमेदवार हा आयात न करता जो प्रामाणिक आणि एकनिष्ठ पक्ष असे राहिलेले आहेत त्यांना संधी देऊन त्यांचा सन्मान करावा जेणेकरून पक्षाची प्रतिमा सर्वसामान्य लोकांमध्ये स्वच्छ राहील. नाहीतर असे होऊ नये, उमेदवार सक्षम न देता एखाद्या दुसऱ्या पक्षातील उमेदवाराला सहकार्य करू नये अशी विनंती देखील प्रीतम खरात करणार आहेत पक्षाकडे हे सांगण्यात आले. आपला पक्ष कसा बळकट होईल याच्या दृष्टिकोनातून उमेदवार देण्यात यावा. मागील निवडणुकीमध्ये थोड्या फरकाने प्रतिस्पर्धी उमेदवार पराभूत झाला होता या गटामध्ये पक्षाचे ताकद खूप मोठी आहे. युसुफ वडगाव सर्कल मध्ये रमेशराव आडसकर यांच प्राबल्य आहे. शिवाय त्यांची काम करण्याची पद्धत याचा विचार केला असता येणाऱ्या जिल्हा परिषद निवडणुकीमध्ये युसुफ वडगाव जिल्हा परिषद गट राष्ट्रवादी कॉँग्रेसच्या ताब्यात येणे सहज शक्य आहे. ज्या प्रकारे कार्यकर्ता हा पक्षामध्ये संघटनात्मक बांधणी करून पक्ष वाढवण्यासाठी काम करत असतो त्याच प्रकारे त्या कार्यकर्त्याला न्याय देणे पक्षाची भूमिका असावी असे मत प्रीतम खरात यांनी मांडले असुन लवकरच पक्षाचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना भेटून निवेदनाद्वारे मागणी करणार असल्याचे स्पष्ट केले.



लातूर तहसील कार्यालयाचे कर्तव्यदक्ष, धाडसी, कर्तबगार तहसीलदार सौदागर तांदळे यांना दैनिक महावृत्त या दीप उत्सवाचे अंक देत असताना अशोक हनवते संपादक दैनिक महावृत्त

## चीन-जपानमध्ये तणाव वाढला

टोकीयो : पूर्व आशियात चीन आणि जपान यांच्यातील तणाव अभूतपूर्व वाढला आहे. जपानच्या नव्या नेतृत्वाने तैवानच्या रक्षणासाठी सैन्य पाठवण्याची तयारी दाखवल्याने चीनने तीव्र आक्षेप घेतला आहे. दोन्ही देशांमध्ये युद्ध होण्याची शक्यता सध्या आर्थिक अवलंबित्व आणि जागतिक दबावामुळे कमी आहे. परंतू, चीननेही जपानला थेट युद्धाची धमकी दिल्याने खळबळ उडाली आहे.चीन आणि जपान यांच्यातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर जपानच्या परराष्ट्र मंत्रालयाचे दूत आणि आशियाई व ओशियनियन प्रकरणांचे महासंचालक मसाकी कनाई यांनी आपली चीनची अधिकृत भेट पूर्ण करून बिजिंग सोडले आहे. त्यांच्या या मौन प्रस्थानामुळे दोन्ही देशांमधील संबंधांच्या भवितव्याबद्दल जागतिक स्तरावर चिंता व्यक्त केली जात आहे. जापानच्या पंतप्रधानांनी तैवानच्या संरक्षणाबाबत केलेल्या वक्तव्यानंतर चीनमध्ये निर्माण झालेला तणाव कमी करणे आणि द्विपक्षीय संबंध स्थिर करणे, हे मसाकी कनाई यांच्या बीजिंग भेटीचे मुख्य उद्दिष्ट होते. परंतू, मसाकी यांच्या वागण्यामुळे ते विफल ठरल्याचे दिसत आहे.

चर्चा संपल्यानंतर मसाकी कनाई आणि त्यांचे शिष्टमंडळ बीजिंग कॅपिटल आंतरराष्ट्रीय विमानतळावरून परत निघाले. यावेळी विमानतळावर उपस्थित असलेल्या पत्रकारांनी कनाई यांच्याशी बोलण्याचा प्रयत्न केला, मात्र त्यांनी कोणत्याही प्रश्नाचे उत्तर दिले नाही आणि ते थेट विमानाकडे निघाले. दूत गप्प राहिल्यामुळे युद्ध होणार की नाही? या प्रश्नावरील अनिश्चितता कायम आहे.चीन (दुसरी) आणि जपान (चौथी) या जगातील मोठ्या अर्थव्यवस्थांमध्ये संघर्ष झाल्यास जागतिक अर्थव्यवस्था कोलमडेल. सेमीकंडक्टर (चिप्स) पुरवठा खंडित होईल, ज्यामुळे मोबाइल, कार आणि संगणक महाग होतील. यामुळे भारत आणि इतर देशांना महागाई व मंदीचा सामना करावा लागेल.

## नायब तहसीलदार अशोक भंडारे यांच्या लेखी आश्वासनानंतर अमर गायकवाड यांचे आमरण उपोषण तात्पुरत्या स्वरूपात स्थगित

केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील सुकळी येथील ग्रामपंचायत कार्यालयाचे तत्कालीन ग्रामसेवक पवार व तत्कालीन ग्रामसेवक एस.एम. राऊत आणि सरपंच नितीन साहेबराव गायकवाड यांनी संगणमत करून चौदाव्या व पंधराव्या वित्त आयोगाच्या कामांमध्ये लाखो रुपयाचा भ्रष्टाचार केलेल्या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात यावा यासह विविध मागण्या संदर्भात सोमवार दिनांक १७ नोव्हेंबर २०२५ रोजी पासून दोन दिवस अमर गायकवाड यांचे केज तहसील कार्यालया समोर बेमुदत अमरण उपोषण चालू होते परंतु केज तहसीलचे नायब तहसीलदार अशोक भंडारे व केज पंचायत समिती,पंचायत विभागाचे विस्तार अधिकारी अनिल चौरे यांच्या लेखी आश्वासनानंतर अमर गायकवाड यांनी तात्पुरत्या स्वरूपात आमरण उपोषण मागे घेतले आहे जर प्रशासनाने लेखी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे मागणीची पूर्तता न केल्यास यापुढे उग्र स्वरूपाचे आंदोलन अथवा आत्मदहन करणार आहे असा प्रशासनाला इशारा दिला आहे.
याबाबतची सविस्तर माहिती अशी की, सुकळी ग्रामपंचायत मार्फत गावात विविध विकास कामांमध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाला असल्याचा आरोप उपोषण कर्ते अमर गायकवाड हे तहसीलदार केज व गट विकास अधिकारी पंचायत समिती यांना लेखी निवेदन देऊन वेळोवेळी पाठपुरावा करत होते परंतु संबंधित कार्यालयाने त्यांच्या मागणीची दखल घेतली नाही म्हणून ते सोमवारपासून केज तहसील कार्यालयासमोर बेमुदत आमरण उपोषणास बसले आहेत.
उपोषणकर्त्यांच्या पुढील मागण्या:-सुकळी ग्रामपंचायत कार्यालय तत्कालीन ग्रामसेवक पवार, तत्कालीन ग्रामसेवक एस. एम.राऊत व सरपंच नितीन साहेबराव गायकवाड यांनी संगणमत करून चौदाव्या व पंधराव्या वित्त आयोगाच्या कामांमध्ये लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात यावा, दिनांक २५/०९/२०२५ रोजी ग्रामपंचायत कार्यालयाचे शिपाई वाघमारे हा ग्रामसेवक एस एम राऊत यांच्या सांगण्यावरून ग्रामपंचायतचे रजिस्टर घेऊन कोणत्याही प्रकारची ग्रामसभा नसताना सुकळी गावातील ग्रामस्थांच्या रजिस्टरवर सह्या घेत होता त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात यावी, खर्डा,चौसाळा,साळेगाव, माळेगाव,लोखंडी सावरगाव राज्य मार्ग ६४ च्या दुरुस्तीसाठी यश कंट्रक्शन साठी केज तालुक्यामधून खडी, मुरूम, गण खनिज यांचे उत्खनन परवाना, रॉयल्टी भरलेली उत्खनन ठिकाणाचे जिओ टॅगिंग फोटो तसेच इतर सर्व माहिती मिळावी, मांजरा प्रकल्पामध्ये,धनेगाव धरणामध्ये सुकळी ते गोटेगाव दरम्यान असलेल्या केजडीतील पाणी आमच्या शेतामध्ये मागील तीन महिन्यापासून साठून आहे, त्याचा महसूल विभागाकडून तात्काळ पंचनामा करण्यात यावा, सुकळी गावामध्ये १९७२ पासून मांजरा धरण, धनेगाव धरण यामध्ये शेतकऱ्यांच्या जमिनी अधिग्रहण करून त्यांना मावेजा देण्यात आलेला असून तरीदेखील शेतकरी २०२२ पासून शासनाचा विमा व अनुदानाचा लाभ घेऊन शासनाची फसवणूक करत आहेत, या प्रकरणी विमा व अनुदान परत घेत दोषीवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, सुकळी गावामध्ये सन१९९८ मध्ये गावठाण विस्तार योजनेमध्ये भूमी संपादन करून प्लॉट वाटप करण्यात आले होते, हे प्लॉट घर बांधकामासाठी वितरित करण्यात आले होते, या प्लॉट वरती घराचे बांधकाम सहा महिन्यांमध्ये करावे लागेल अन्यथा प्लॉट परत घेण्यात येईल असे नियम असून देखील तब्बल २७ वर्षे चा कालावधी उलटून गेला आहे तरी काही प्लॉट वरती कोणत्याच प्रकारचे घर बांधकाम करण्यात आलेले नाही. तरी या प्लॉट धारकावर शर्तभंगाची कार्यवाही करत सदर प्लॉट गावठाण विस्तार योजनेतून वंचित राहिलेल्या गरजू लोकांना वितरित करण्यात यावेत यासह विविध मागण्या संदर्भात अमर गायकवाड हे मागील दोन दिवसापासून आमरण उपोषणास बसले होते.
तहसील कार्यालयाच्या संदर्भातील मागण्याच्या अनुषंगाने नायब तहसीलदार अशोक भंडारे यांनी सदर मागणीची पूर्तता करु अशा स्वरूपाचे लेखी पत्राद्वारे आश्वासन दिले तर गटविकास अधिकारी पंचायत समिती व विस्तार अधिकारी अनिल चौरे यांनी सुकळी ग्रामपंचायत कार्यालयाचे तत्कालीन ग्रामसेवक पवार व तत्कालीन ग्रामसेवक राऊत आणि सरपंच नितीन गायकवाड यांनी संगणमत करून चौदाव्या व पंधराव्या वित्त आयोगाच्या कामा त लाखो रुपयाचा भ्रष्टाचार केलेल्या प्रकारांची चौकशी दिनांक २१नोव्हेंबर२०२५ रोजी ग्रामपंचायत कार्यालय सुकळी येथे उपस्थित राहून करून आपल्या मागण्याच्या अनुषंगाने प्रशासनाकडून सकारात्मक कार्यवाही करण्यात येईल अशा लेखी आश्वासनाचे पत्र दिल्या नायब तहसीलदार अशोक भंडारे यांच्या लेखी आश्वासनानंतर अमर गायकवाड यांचे आमरण उपोषण तात्पुरत्या स्वरूपात स्थगित

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं.१०, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर-४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास खडक हनुमान मंदिर मिलिंद नगर लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.